# नेहमी विचारले जाणारे प्रश्न [Frequently Asked Questions]

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **(एक) पात्रता/खाते (Profile)/अर्ज** | | |
| १ | आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेकरीता कोण अर्ज करु शकते? | (१) संबंधित परीक्षा/संवर्गाच्या जाहिराती/अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार विहित शैक्षणिक अर्हता / अनुभव / पात्रता धारण करणा-या खालील व्यक्तींना अर्ज करता येईल:-<br>(अ) भारताचा नागरिक<br>(ब) नेपाळचा प्रजाजन<br>(क) भूतानचा प्रजाजन<br>(ड) भारतामध्ये कायमचे स्थायिक होण्याच्या उद्देशाने १ जानेवारी, १९६३ पूर्वी भारतामध्ये आलेला तिबेटी निर्वासित<br>(ई) भारतामध्ये कायम स्थायिक होण्याच्या उद्देशाने पाकिस्तान, ब्रह्मदेश, श्रीलंका आणि पूर्व आफ्रिकेतील केनिया, युगांडा आणि (पूर्वी टांगानिका व झांजिबार म्हणून ओळखले जाणारे) टांझानियाचे संयुक्त प्रजासत्ताक, झांबिया, झैरे, मालावी, इथियोपिया आणि व्हिएतनाम येथून स्थलांतर करून आलेली मूळची भारतीय असलेली अशी व्यक्ती असली पाहिजे.)<br>(२) तथापि, वरील (ब ) ते (ई ) या वर्गातील उमेदवारांजवळ महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावे दिलेले पात्रता प्रमाणपत्र असले पाहिजे. |
| २ | महाराष्ट्राची रहिवासी नसलेली व्यक्ती आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकते काय? | होय, महाराष्ट्राची रहिवासी नसलेली व्यक्ती अराखीव-सर्वसाधारण पदावरील निवडीकरीता सहभागी होऊ शकते. |
| ३ | मराठी भाषेचे ज्ञान नसलेली व्यक्ती आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकते काय? | होय, परंतु शासन सेवेतील निवडीनंतर शासन धोरणानुसार मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा मराठी वाचता, लिहिता व बोलता येत असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. |
| ४ | महाराष्ट्र-कर्नाटक विवादित सीमा भागातील व्यक्ती आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकते काय? | होय, सदर व्यक्ती केवळ अराखीव-सर्वसाधारण पदांवरील निवडीकरीता सहभागी होऊ शकते. |
| ५ | आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेकरीता अर्ज सादर करण्याची पध्दत काय आहे? | (१) आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर सर्व आवश्यक तपशीलासह प्रोफाईल तयार करुन संबंधित पद/भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर फक्त ऑनलाईन पध्दतीने विहित शुल्कासह अर्ज करता येईल.<br>(२) विहित परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने तसेच स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये चलनाद्वारे करता येईल.<br>(३) सविस्तर सूचना आयोगाच्या संकेतस्थळावरील " उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" तसेच संबंधित जाहिरात/अधिसूचनेद्वारे देण्यात येतात. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| ६ | अर्ज सादर करण्यात कोणत्याही कारणाने अडचण आल्यास कोणाशी संपर्क करावा? | तांत्रिक अडचणीसंदर्भात आयोगाच्या 7303821822 and 02269123914 या टोल फ्री क्रमांकावर किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेलवर संपर्क करता येईल. |
| ७ | परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा केला नसल्याचे दिसत असल्यास काय करावे? | (१) ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा यशस्वी झाल्यास, सदर भरणा यशस्वी झाल्याची पावती (Status Paid / भरणा केली) तात्काळ उमेदवाराच्या खात्यामध्ये दिसून येते.<br>(२) ऑनलाईन पद्धतीने शुल्काचा भरणा करतेवेळी प्रक्रिया सुरु असताना, इंटरनेट सेवा, Payment Gate-way मंद असणे, इंटरनेट सेवा मधूनच खंडित होणे, संगणक बिघडणे, इत्यादी कारणांमुळे काही वेळा शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही. परंतु उमेदवाराच्या बँक खात्यातून रक्कम वजा होते, सदर रक्कम आयोगाच्या खात्यामध्ये पोहोचत नाही व कालांतराने उमेदवाराच्या बँक खात्यामध्ये पुन्हा जमा होते. त्यामुळे ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही करताना उमेदवाराने भरणा यशस्वी झाल्याची पावती (Status Paid / भरणा केली) प्राप्त झाली असल्याची खात्री विहित दिनांकाच्या आत करुन घेणे.<br>(३) केवळ उमेदवाराच्या खात्यामधून रक्कम वजा झाली म्हणजे परीक्षा शुल्काचा यशस्वी भरणा झाला असे नाही. |
| ८ | अर्ज करण्याची विहित मुदत संपल्यानंतर अर्ज सादर करता येऊ शकतो काय? | आयोगाकडून अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ दिल्याखेरिज कोणत्याही परिस्थितीत विहित मुदत संपल्यानंतर अर्ज सादर करता येत नाही. |
| ९ | विहित मुदतीत अर्ज सादर केला परंतु, परीक्षा शुल्काचा भरणा चलनाद्वारे बँकेत विहित मुदतीनंतर केल्यास अर्ज ग्राह्य धरला जातो काय? | विहित मुदतीत अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणासुध्दा विहित मुदतीत करणे आवश्यक आहे. |
| १० | प्रोफाईलमध्ये Freeze केलेल्या तपशीलात बदल करण्याची पध्दती काय आहे? | Freeze केलेला तपशील हा सामान्यत: न बदलणारा असतो. तथापि, उमेदवाराकडून अनावधानाने सदर तपशील नोंदविला गेल्यास बदल करावयाच्या तपशीलाबाबत समर्थनार्थ पुरावा सादर करुन, युजर आयडी व आधार क्रमांकासह support-online@mpsc.gov.in या ईमेलवर अथवा आयोगाच्या कार्यालयाच्या पत्त्यावर विनंती अर्ज केल्यास सदर बदल करण्याबाबत आयोगाच्या कार्यालयाकडून प्रकरणपरत्वे गुणवत्तेवर उचित निर्णय घेण्यात येतो. |
| ११ | प्रोफाईल Deactivate झाले असल्याचे दाखवत आहे. पुन्हा सुरु (Activate) करण्यासाठी काय करावे लागेल? | प्रोफाईल संदर्भातील माहिती आधार क्रमांक / व्हर्चुअल आयडी (VID)/ ऑफलाईन आधार केवायसी फ़ाईल यापैकी कोणताही एक तपशील नमूद करुन प्रोफाईल सुरु (Activate) करण्याची विनंती support-online@mpsc.gov.in या ईमेलवर पाठवावी. |
| १२ | प्रोफाईल मधील मोबाईल क्रमांक/ ईमेल आयडी बदलायचा आहे, त्यासाठी काय करावं लागेल? | ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाच्या मुख्य पृष्ठावरील ‘Forgot / Reset Email-ID and Mobile Number’ या लिंकवरुन उमेदवार स्वत: त्याच्या प्रोफाईलमधील ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक बदलू शकतो. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **(दोन) शैक्षणिक अर्हता** | | |
| १ | एखाद्या संवर्गाच्या जाहिरातीतील शैक्षणिक अर्हतेमध्ये नमूद अर्हतेव्यतिरिक्त इतर समतुल्य शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारास संबंधित भरतीप्रक्रियेकरीता अर्ज करता येईल काय? | संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यास व तसे संबंधित पदाच्या जाहिरातीत नमूद असल्यास महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या अर्हता स्वीकारार्ह असतील. |
| २ | उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक अर्हता संबंधित संवर्गाच्या जाहिरातीमध्ये नमूद असूनही उमेदवारास अर्ज करण्यात अडचण येत असल्यास कोणाकडे संपर्क करावा? | आयोगाच्या कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी अर्जाद्वारे किंवा sectionofficer-advt@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क करता येईल. |
| ३ | पदवीच्या अंतिम वर्षाला असलेल्या व/किंवा टंकलेखन परीक्षा दिली आहे परंतु प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाहीत; असे उमेदवार परीक्षेकरीता अर्ज करु शकतात काय? | पदवीच्या अंतिम वर्षाला असलेल्या व/किंवा टंकलेखन परीक्षा दिली आहे परंतु प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही; असे उमेदवार संबंधित पदाच्या पूर्व परीक्षेकरीता अर्ज करु शकतात. तथापि, मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी पदवीच्या अंतिम वर्षाचा निकाल व/किंवा टंकलेखन प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. |
| **(तीन) सामाजिक आरक्षण** | | |
| १ | शासनाकडून सामाजिक प्रवर्गांकरीता विशिष्ट प्रमाणात आरक्षण दिले असले तरी आयोगाकडून काही जाहिरातींमध्ये काही प्रवर्गांना एकही पद आरक्षित का दाखवले जात नाही? | शासनाकडून पदभरतीकरीता पाठविलेल्या मागणीपत्रानुसार जाहिरातीमध्ये सामाजिक प्रवर्गनिहाय पदसंख्या नमूद केलेली असते. कोणत्या सामाजिक प्रवर्गाकरीता पद आरक्षित ठेवावयाचे आहे, याचा निर्णय प्रचलित शासन धोरणानुसार शासनाच्या संबंधित विभागाकडून घेण्यात येतो. जाहिरातीमधील आरक्षित पदसंख्या निश्चित करण्यामध्ये आयोगाची कोणतीही भूमिका असत नाही. |
| २ | मागासवर्गीयांसाठी असलेल्या वय, परीक्षा शुल्क, इत्यादीचा लाभ घेतल्यास अराखीव पदावर शिफारस करण्यात येते काय? | होय |
| **(चार) समांतर आरक्षण [महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन, अनाथ ]** | | |
| १ | समांतर आरक्षणानुसार आरक्षित पदावर पात्र उमेदवार न मिळाल्यास सदर पदावर कोणाची निवड करण्यात येते? | संबंधित प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येते. |
| २ | मागासवर्गीय दिव्यांग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन, अनाथ इत्यादी उमेदवारांची अराखीव पदावर निवड होऊ शकते का? | होय |
| ३ | अर्जामध्ये दिव्यांग / महिला / प्राविण्यप्राप्त खेळाडू / माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / पदवीधर अंशकालीन / अनाथ असल्याचा दावा करुनही संबंधित उमेदवारांकरीता आरक्षित पदावर निवड न होण्याचे कारण काय ? | अर्जामध्ये दिव्यांग / महिला / प्राविण्यप्राप्त खेळाडू / माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / पदवीधर अंशकालीन / अनाथ असल्याचा दावा करण्याबरोबरच महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण रहिवासी असणे व अर्जामध्ये महाराष्ट्रामध्ये अधिवास असल्याचा स्पष्टपणे दावा करणे तसेच सदर दाव्याच्या अनुषंगाने अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| **(पाच) महिला** | | |
| १ | विवाहित महिलांनी कोणत्या नावाने अर्ज करावा? | एसएससी अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाने अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि, अर्जात बदललेल्या नावाचा तपशील नमूद करणे व नावात बदल केला असल्याचा पुरावा आयोगाच्या मागणीनुसार सादर करणे आवश्यक आहे. |
| २ | विवाहित महिलांनी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र कोणत्या नावाने सादर करावे? | यासंदर्भातील प्रचलित शासन धोरणानुसार नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र लागू असलेल्या आरक्षित प्रवर्गातील महिलांनी विवाहापूर्वीच्या नावाने व विवाहापूर्वीच्या कुटुंबाच्या उत्पन्नानुसार नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| **(सहा) माजी सैनिक** | | |
| १ | माजी सैनिकांना कोणत्या संवर्गासाठी व किती आरक्षण आहे? | गट-क व गट-ड संवर्गासाठी १५%<br>गट-अ व गट-ब संवर्गासाठी कोणतेही आरक्षण नाही. |
| २ | पोलीस उपनिरीक्षक संवर्गासाठी माजी सैनिक उमेदवारांना आरक्षण लागू आहे काय? | पोलीस उपनिरीक्षक हे पद अराजपत्रित गट-ब संवर्गातील असल्याने माजी सैनिक उमेदवारांना सदर संवर्गाकरीता आरक्षण लागू नाही. |
| ३ | माजी सैनिक उमेदवारांना गट-अ व गट-ब पदासाठी कोणते लाभ मिळतात? | माजी सैनिक उमेदवारांना गट-अ व गट-ब पदासाठी केवळ उच्च वयोमर्यादेमध्ये सवलत अनुज्ञेय आहे. |
| **(सात) दिव्यांग व्यक्ती** | | |
| १ | एखाद्या दिव्यांग उमेदवाराच्या दिव्यांगत्व प्रकाराकरीता जाहिरातीमध्ये आरक्षित पद दर्शविले नसल्यास असे दिव्यांगत्व असलेला उमेदवार सदर संवर्गाकरीता अर्ज करु शकतो का? | जाहिरातीमध्ये नमूद दिव्यांग सुनिश्चितीच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या दिव्यांग प्रकार/उपप्रकार असणारे उमेदवारच सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज करु शकतात. |
| २ | दिव्यांग उमेदवारास लेखनिकाची मदत घेण्याची/अनुग्रह कालावधी मिळण्याकरीताची पध्दत काय आहे? | **(१)** दिव्यांग असल्याबाबत तसेच लेखनिकाची आवश्यकता असल्याबाबत ऑनलाईन अर्जाद्वारे स्पष्ट दावा केल्यानंतर तसेच संबंधित परीक्षेसाठी लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या अनुषंगाने विनंती करण्याबाबत प्रसिध्दीपत्रक प्रसिध्द केल्यानंतर विहित कालावधीत अर्जाचा क्रमांक व परीक्षेचे नाव नमूद करुन प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद ईमेलवर विनंती अर्ज करता येईल.<br>(२) आयोगाच्या संकेतस्थळावरील https://mpsc.gov.in/downloadFile/english/4887 या लिंकवर सविस्तर मार्गदर्शक सूचना उपलब्ध आहेत. |
| ३ | आयोगाकडे स्वतंत्रपणे अर्ज केल्याशिवाय केवळ अर्जात केलेल्या दाव्याच्या आधारे लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळू शकेल काय? | विहित कागदपत्रासह स्वतंत्र अर्ज केल्याशिवाय तसेच आयोगाकडून अधिकृतरित्या संकेतस्थळावर प्रसिध्द यादीमध्ये नाव समाविष्ट झाल्याशिवाय लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळू शकणार नाही. |
| ४ | प्रत्येक परीक्षेकरीता लेखनिक/अनुग्रह कालावधीसाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे काय? | प्रत्येक परीक्षेकरीता विहित कागदपत्रांसह स्वतंत्र विनंती अर्ज करणे आवश्यक आहे. |
| ५ | लेखनिक (Scribe/Writer) मिळण्यासाठी ईमेलद्वारे स्वतंत्र अर्ज करुनही संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये नाव आले नसल्यास काय करावे? | विहित कार्यपध्दतीनुसार लेखनिकाचा अर्ज आणि कागदपत्रे संबंधित ईमेलवर सादर करण्यात यावीत. नियमानुसार पात्र ठरल्यास सुधारित यादीमध्ये नाव समाविष्ट होऊ शकते. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **(आठ) प्राविण्यप्राप्त खेळाडू** | | |
| १ | प्राविण्यप्राप्त खेळाडूसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता काय करावे लागेल? | **(१) स्पर्धा परीक्षा :-**<br>(अ) प्राविण्यप्राप्त खेळाडूच्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्राप्त केला असणे आवश्यक आहे.<br>(ब) पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्राप्त झाला नसल्यास; क्रीडा विषयक प्रमाणपत्रे पडताळणीसाठी सादर केली असल्याबाबतच्या पोच पावतीची प्रत सादर करणे अनिवार्य आहे.<br>**(२) विशिष्ट अर्हता व/अथवा अनुभव आधारित सरळसेवा भरती:-**<br>अर्ज करणा-या प्राविण्यप्राप्त खेळाडूंची क्रीडा प्रमाणपत्रे संबंधित विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणित केल्याचा अहवाल अर्ज करण्याच्या दिनांकाचा किंवा तत्पूर्वीच्या दिनांकाचा असणे आवश्यक आहे. |
| **(नऊ) अनाथ** | | |
| १ | आई अथवा वडील यापैकी एक व्यक्ती हयात असल्यास अनाथांच्या आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत का? | आई व वडील दोन्ही हयात नसल्यास आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत. |
| २ | आई व वडील यांचे निधन उमेदवाराच्या वयाच्या १८ वर्षानंतर झाले असल्यास अशा उमेदवारास अनाथांच्या आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत का? | आई व वडील यांचे निधन अनाथ उमेदवाराच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झाले असेल तरच आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत. |
| **(दहा) अनुभव प्रमाणपत्र** | | |
| १ | अनुभव प्रमाणपत्र आयोगाकडून जारी करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे का? | होय, नियुक्ती पत्र, वेतन चिठ्ठी, ओळखपत्र इत्यादी कागदपत्रे अनुभव प्रमाणपत्र म्हणून ग्राह्य धरली जात नाहीत. |
| २ | अनुभवाची गणना करताना कोणत्या नेमणूकीचा अनुभव ग्राह्य धरण्यात येतो? | रोजंदारी, कार्यव्ययी, करारपध्दती, मानधन इत्यादी स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येतो. |
| ३ | कोणत्या नेमणूकीचा अनुभव ग्राह्य धरण्यात येत नाही? | तासिका, नियतकालिक, अंशकालीन, विद्यावेतनी, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतनी तत्वावरील अशकालीन सेवेचा कालावधी, प्रभारी म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येत नाही. |
| **(अकरा) जिल्हाकेंद्र निवड** | | |
| १ | जिल्हाकेंद्र निवडीचा पर्याय उपलब्ध नसलेल्या भरती/परीक्षेकरीता उमेदवारांस कोणत्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश दिला जातो? | उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्या आधारे संबंधित महसुली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अथवा संबंधित महसुली मुख्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर किंवा फक्त मुंबई / नवी मुंबई जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या- त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल. |
| २ | उमेदवाराने निवडलेले व निवडले नसल्यास आयोगाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेले जिल्हाकेंद्र बदलून मिळू शकते काय? | जिल्हाकेंद्र बदलून दिले जात नाही. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **(बारा) ओळखपत्र** | | |
| १ | परीक्षेच्या वेळी ओळखीचा पुरावा म्हणून कोणते ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल काय? | **(१)** ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे **आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स** यापैंकी कोणतीही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. याव्यतिरिक्त कोणतेही ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.<br>**(२)** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधारवर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह कलर प्रिंटमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.<br>**(३)** अन्य कोणत्याही प्रकारचा पुरावा ग्राह्य धरला जात नाही. |
| **(तेरा) प्रतीक्षा यादी** | | |
| १ | प्रतीक्षा यादी ठेवली जाते काय? | (१) एकल संवर्ग असलेल्या सर्व परीक्षांची गुणवत्ता यादी हीच प्रतीक्षा यादी असते.<br>(२) आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी नियुक्ती न स्वीकारल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणासाठी नियुक्ती झाली नसल्यास संबंधित रिक्त पदावर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची शिफारस करण्याबाबत शासनाकडून विहित कालावधीत विनंती करण्यात आली तरच आयोगाकडून प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची शिफारस करण्याबाबत विचार करण्यात येतो.<br>(३) जाहिरातीमध्ये/अधिसुचनेमध्ये नमूद पदसंख्येव्यतिरिक्त जादा पदभरतीसाठी प्रतीक्षायादी कार्यान्वित करता येत नाही.<br>(४) विहित कालावधीमध्ये शासनाकडून प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांची मागणी प्राप्त झाली तरच आयोगाकडून प्रतीक्षा यादीवरील पात्र उमेदवाराची शिफारस होऊ शकते. |
| **(चौदा) वेळापत्रक/परीक्षा/शारीरिक चाचणी/मुलाखत** | | |
| १ | संभाव्य वेळापत्रकामध्ये नमूद परीक्षेची जाहिरात कधी येईल? शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे काय? | (१) संभाव्य वेळापत्रक प्रसिध्द केल्यानंतर वेळापत्रकानुसार जाहिरात प्रसिध्द करुन परीक्षा घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो.<br>(२) शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे/नाही; याविषयी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वेळापत्रकाबाबतची सद्यस्थिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते. |
| २ | ................. (कोणत्याही) परीक्षेचा निकाल कधी लागेल? | परीक्षा झाल्यानंतर साधारणपणे दोन-तीन महिन्यात निकाल लागतो. त्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ३ | .................. (कोणत्याही) पदाची जाहिरात कधी येणार आहे? | (१) स्पर्धा परीक्षा:- वेळापत्रकानुसार/घोषित केलेल्या दिनांकानुसार परीक्षा होते. त्यानुसार परीक्षेच्या नियोजित दिनांकापूर्वी साधारणपणे किमान एक ते दिड महिना अगोदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येते.<br>(२) विशिष्ट अर्हता आणि/अथवा अनुभव आधारित सरळसेवा भरती:- जेव्हा शासनाकडून मागणीपत्र प्राप्त होते; तेव्हा जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. |
| ४ | निकाल जाहिर झालेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिका यांची प्रत कशाप्रकारे मिळू शकते? | (१) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी उत्तरपत्रिका :- निकाल जाहिर झाल्यानंतर सर्वसाधारणपणे एका आठवड्यानंतर परीक्षेचे गुण व उत्तरपत्रिकेची प्रत उमेदवाराच्या खात्यात एक महिना कालावधीसाठी उपलब्ध करुन दिली जाते.<br>(२) पारंपरिक /वर्णनात्मक उत्तरपुस्तिका:- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत संबंधित उमेदवाराला अंतिम निकालानंतर उत्तरपुस्तिकांची प्रत उपलब्ध होऊ शकते. |

टीप :- उमेदवारांसमोर सर्वसाधारणपणे उपस्थित होणाऱ्या प्रश्नांच्या अनुषंगाने उपरोक्त माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर माहितीमधील कोणतीही बाब जाहिरात/अधिसूचना तसेच संबंधित भरतीप्रक्रियेसंदर्भात स्पष्टपणे प्रसिध्द करण्यात आलेला कोणताही तपशील जसे की शुध्दीपत्रक. प्रसिध्दीपत्रक, इत्यादीमधील तरतुदींशी विसंगत असल्यास उपरोक्त माहितीमधील तरतुदी दुय्यम राहतील.